महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१ फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.८९५/ २२४३७ दिनांक : २३.०९.२०२१

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या,
सर्व परिमंडळ कार्यालय.

**विषय : तंत्रज्ञ/ वरीष्ठ तंत्रज्ञ अथवा विद्युत सहाय्यक पदावरती कार्यरत असताना उपकेंद्र सहाय्यक पदी निवड झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सरळसेवा भरती अंतर्गत महावितरण कंपनीमध्ये विद्युत सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यक या पदांकरीता वेळोवेळी जाहीरातींद्वारे तीन वर्षाच्या कंत्राटी कालावधी करीता नियुक्त करण्यात येते. अशा भरती अंतर्गत कंपनीमध्ये कार्यरत असणारे तंत्रज्ञ/ वरीष्ट तंत्रज्ञ आणि विद्युत सहाय्यक यांनी उपकेंद्र सहाय्यक पदाकरीता अर्ज केल्याने त्यांची देखोल नियुक्ती उपकेंद्र सहाय्यक या कंत्राटी पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२. कंपनीमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची उपकेंद्र सहाय्यक पदी नियुक्ती करण्यात आल्यामुळे त्यांच्या वेतनाबाबत काही मुद्दे उपस्थित झाल्यामुळे महाव्यवस्थापक (मासं-नियोजन) यांचा ई-मेल संदेश दि.१६.०९.२०१५ अन्वये तंत्रज्ञ/ वरीष्ट तंत्रज्ञ पदावरून उपकेंद्र सहाय्यक पदी रूजू झालेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व तदअनुषंगिक लाभ संरक्षित करण्याच्या सूचना यापूर्वीच पारीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच कार्यकारी संचालक (मासं) सांघिक कार्यालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र. HRD/RC/F.No-४१/२७५३२ दि. ०६.०९.२०१६ आणि अन्वये विद्युत सहाय्यक पदावरून उपकेंद्र सहाय्यक पदी निवड झालेल्या कर्मचाऱ्यांचा विद्युत सहाय्यक पदी रूजू झाल्यापासून तीन वर्षांचा कंत्राटी कालावधी पुर्ण झाल्यानंतर त्यांचे तंत्रज्ञ या पदाच्या वेतनश्रेणी मध्ये वेतन निश्चिती करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

२. सांघिक कार्यालय, मुंबई येथे विविध संघटना सोबत झालेल्या बैठकीमध्ये उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद केलेली बाब क्षेत्रीय कार्यालयांकडून पालन केली जात नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आणुन देण्यात आली आहे. यास्तव सदर बाब सांघिक कार्यालयाचे पत्र क्र.मासंवि/रवका/न.क्र.८९५/१७४९ दि. २१.०१.२०२१ अन्वये यापूर्वीच क्षेत्रिय कार्यालयास अवगत करण्यात आलेली होती.

३. याबाबत कळविण्यात येते की, तंत्रज्ञ/ वरीष्ठ तंत्रज्ञ किंवा विद्युत सहाय्यक पदावरुन उपकेंद्र सहाय्यक पदी निवड झालेल्या कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती करीत असतांना खालील सूचनांचा अवलंब करण्यात यावा.

अ) तंत्रज्ञ / वरीष्ट तंत्रज्ञ या नियमित पदावरून उपकेंद्र सहाय्यक या कंत्राटी पदावर नियुक्ती दिल्यास उपकेंद्र सहाय्यक पदी रूजू झालेल्या दिनांकापासून सदर कर्मचाऱ्याचे वेतन, सर्व भत्ते, वेतनवाढ, अतिकालिक भत्ता व इतर अनुषंगीक लाभ संरक्षित करण्यात यावे त्यानुसार वेतन अदा करण्यात यावे.

ब) वरील (अ) नुसार वेतन संरक्षित करीत असतांना प्रादेशिक भत्ते (उदा: नक्षलग्रस्त भागातील प्रोत्साहन भत्ता, एकस्तर वेतनश्रेणी इ.) अथवा इतर विशेष भत्ते सध्याच्या पदस्थापनेच्या टिकाणी लागू असल्यास अदा करण्यात यावेत अन्यथा सदर भत्ते अदा करण्यात येवू नयेत.

४. सबब, सर्व संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन वरील प्रमाणे संरक्षित करण्यात आलेले नाही, अशा कर्मचाऱ्यांना वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करून योग्य भत्ते वेतन फरकासह अदा करण्यात यावे.

(अ.म.भादीकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:-**
सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद / कोकण (कल्याण).

**प्रत सस्नेह सादर:-**
प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे/नागपूर.

**प्रत रवाना:-**
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई-५१.